N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** गंगाखेड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0130 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/03/2024 16:03

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 12/03/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 12/03/2024
**Time From (वेळेपासून):** 09:46 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 10:32 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/03/2024 **Time (वेळ):** 15:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 022
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/03/2024 15:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सोपान काकाच्या मंदिराजवळील लोक

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** गंगाखेड
**District(State) (जिल्हा(राज्य)):** परभणी(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** उध्दव भगवानराव सोळंके

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रुमना ज ता गंगाखेड ,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रुमना ज ता गंगाखेड ,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मोहन सुरेशराव देशमुख | | | 1. तालुका कषी कार्यालय, गंगाखेड,,हमु गणेश नगर, अहमदपुर मुळ गा,गंगाखेड, परभणी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 06 नोटा. | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यारा)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 12.03.2024

फिर्याद

मी उध्दव भगवानराव सोळंके, वय 38 वर्ष, व्यवसाय शेती, रा. मु. रुमना (ज.) ता. गंगाखेड जि. परभणी मो. न. 9420623206, 9404014450.

समक्ष पोलीस ठाणे गंगाखेड, परभणी येथे फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणार असुन शेती करुन आपल्या कुंटुंबाची उपजिवीका भागवितो.

दिनांक 05/03/2024 रोजी मी अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी येथील पोलीस उप अधीक्षक श्री इप्पर साहेब यांना माझी एका लोकसेवकाविरुध्द तक्रार आहे असे फोनवर कळविल्याने त्यांनी व्हॉट्सअॅप वर प्रलंबित कामाची कागदपत्रे मागवुन घेतली व त्यांची लाच मागणीची खात्री झाल्यानंतर त्यांनी गंगाखेड येथे येवुन मला फोन करून मला गंगाखेड येथे बोलावुन घेतले. तेथे त्यांनी माझी अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी येथील पोलीस निरीक्षक श्री सदानंद वाघमारे साहेब, राज्य परिवहन मंडळ परभणी आगारातुन आणलेले दोन शासकीय पंच नामे 1.श्री सतिष शिवाजी, फड वय 35 वर्ष, चालक/वाहक बि. नं. 733, व 2.श्री सय्यद इम्रान सय्यद युनूस, वय 35 वर्ष, वाहक बि. नं. 22081 तसेच सापळा पथकातील अंमलदारांची ओळख करून दिली.

त्यानंतर मी त्यांना माझी लेखी तक्रार दिली की, माझा पुतण्या नामे यशोधन जगमित्र सोळंके रा. रुमना ता. गंगाखेड जि. परभणी याची कृषी विभागाने राबविलेल्या ऑन लाईन सोडत प्रक्रियेतुन राज्य कृषी यांत्रिकीकरण योजने अंतर्गत टॅक्टर/पॉवर टिलर चलित औजारे - 35 बीएचपी पेक्षा जास्त रोटा व्हेटर - रोटा व्हेटर 5 फुट खरेदीसाठी पुर्व समंती मिळाली असुन त्यासाठी त्याला 42,000/- रुपये अनुदान मंजुर झाले आहे. माझा पुतण्या नामे यशोधन याने रोटा व्हेटर खरेदी केला आहे.

माझा पुतण्या नामे यशोधन याने वरील योजने अंतर्गत खरेदी केलेल्या रोटा व्हेटर ची पाहणी करण्यासाठी तसेच रोटा व्हेटरचे फोटो काढुन ते ऑन लाईन आपलोड करण्यासाठी दिनांक 21/02/2024 रोजी गंगाखेडचे कृषी पर्यवेक्षक मोहन देशमुख हे आमचे रुमना गावी आले होते. त्यावेळी ते मला म्हणाले की, तुमच्या पुतण्याच्या नावे मंजुर झालेल्या रोटा व्हेटरच्या अनुदानाची रक्कम त्याच्या बॅंक खात्यावर मिळवुन देण्याच्या कामासाठी पाठपुरावा करुन अनुदानाची रक्क्म मिळवुन देतो. त्यासाठी पुतण्याचे बॅंक पासबुक व 7/12 होल्डींग ची प्रत आणुन द्या. ती कागदपत्र वेबसाईटवर अपलोड करतो मग तुमच्या पुतण्याचे बॅंक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा होईल असे सांगितले. त्यानंतर ते मला म्हणले की, मी तुमचे मोठे काम केले आहे, आणि यापुर्वी सुध्दा तुमचे भाऊ जगमित्र सोळंके यांना पण टॅक्ट्रर मंजुर करुन दिले आहे. तेंव्हापण तुम्ही मला येवुन भेटतो असे म्हणले होते परंतु तुम्ही येवुन भेटला नाहीत. यावरुन त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन त्यांची माझ्याकडुन लाच घेण्याची इच्छा आहे. परंतु या कामासाठी मला त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही. त्यामुळे मी त्यांना नाईलास्तव होकार देवुन दोन ते तिन दिवसाचा वेळ मागुन घेतला व नंतर भेटतो असे म्हणलो आहे.

माझा पुतण्या यशोधन जगमित्र सोळंके यांची 12 वी परिक्षा चालु असल्याने तो या कार्यवाहीत येवु शकत नसल्याने मी त्याचेकडुन त्याचे वतीने काम करुन घेण्याचे प्राधिकार पत्र घेतले आहे.

गंगाखेडचे कृषी पर्यवेक्षक मोहन देशमुख यांचेशी माझा तसेच माझे पुतण्याचा कोणत्याही प्रकारे देवाण घेवाणीचा व्यवहार नाही किंवा त्यांचेशी आमचे वैर नाही.

माझा पुतण्या नामे यशोधन जगमित्र सोळंके याने रोटा व्हेटर खरेदी केलेल्या मंजुर अनुदान रक्कमेच्या कामाबाबत मी आज दिनांक 05/03/2024 रोजी गंगाखेडचे कृषी पर्यवेक्षक मोहन देशमुख यांना गंगाखेड येथे जावुन भेटणार आहे. गंगाखेडचे कृषी पर्यवेक्षक मोहन देशमुख यांनी माझ्या पुतण्याचे कामासाठी स्वतः अगर इतरांमार्फत लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी.

मी दिलेल्या तक्रारीवर पोलीस निरीक्षक श्री. वाघमारे एसीबी, परभणी व राज्य परिवहन मंडळ परभणी आगारातील

शासकीय पंच नामे 1. सतिश शीवाजी फड वय 35 वर्ष चालक/वाहक बि. नं. 733, व 2.श्री सय्यद इम्रान सय्यद युनूस वय 35 वर्ष वाहक बि. नं. 22081 यांनी माझी तक्रार वाचून त्या तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघमारे साहेब यांचे सुचनेवरुन पोशी/कल्याण नागरगोजे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये एक नवीन कोरे मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये आमचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर लोकसेवक मोहन देशमुख हे मला ज्या ठिकाणी भेटण्यास बोलवतील त्या ठिकाणी जावुन त्यांची भेट घेवुन त्यांचेवर पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्याकरीता मी लोकसेवक मोहन देशमुख यांना फोन केला त्यावेळी त्यांनी मला ते कामात आहेत. थोड्यावेळाने फोन करतो असे कळविले. त्यानंतर काही वेळाने लोकसेवक मोहन देशमुख यांनी मला फोन केला. त्यांनी मला गंगाखेड ते लोहा रोडवरील दत्तमंदीरा जवळील हॉटेलकडे येण्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघमारे साहेब यांचे सुचनेवरुन पोशी/कल्याण नागरगोजे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या शर्टच्या आतील बाजुस गळयात लटकावुन दिला. त्यानंतर पंच क्र.01 सतिश फड यांचे सह माझ्याजवळील मोटारसायकल क्रमांक एम एच 22 ए के 3671 ने लोकसेवक मोहन देशमुख यांची भेट घेवुन पडताळणी करण्यासाठी आम्हा दोघांना रवाना केले.

पडताळणी कार्यवाहीत लोकसेवक मोहन देशमुख यांनी मला माझा पुतण्या नामे यशोधन यास अनुदानावर मंजुर झालेल्या रोटा व्हेटरच्या कामाचे तसेच माझा भाउ जगमित्र याचे यापुर्वी केलेल्या टॅक्टर मंजुरीच्या कामाचे मिळुन 3,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम लगेच स्विकारण्याची समंती दिली.

लोकसेवक मोहन देशमुख यांनी मागणी केलेली लाच रक्कम 3,000/- रुपये मी सापळा पुर्व व सापळा कार्यवाहीत पंचासमक्ष हजर केली. सदर रकमेच्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन घेतले. त्यानंतर पोशी/शेख जिब्राईल यांनी अॅथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्माबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर मी जमा केलेल्या लाचरकमेस अॅथ्रासिन पावडर लावुन ती माझ्या अंगावरील शर्टच्या डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिली. त्यानंतर पोशी/कल्याण नागरगोजे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला पंच क्र 1 सतिश फड यांचेसोबत माझ्याजवळील मोटारसायकलने गंगाखेड ते लोहा रोडवरील दत्तमंदीर परिसरातील लोकसेवक देशमुख यांच्या रुमकडे रवाना केले. आमच्या पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले. मी गंगाखेड ते लोहा रोडवरील दत्तमंदीरा जवळील पेट्रोल पंम्पाजवळ येवुन लोकसेवक देशमुख यांना फोन केला असता त्यांनी मला सांगितले की, ते गावाला निघाले आहेत. त्यामुळे लोकसेवक यांची सापळा कार्यवाहीत भेट न झाल्याने मी सापळा पथकास विनंती केली की, मला काम असल्यामुळे सदर कार्यवाही स्थगित करुन दिनांक 11/03/2024 रोजी सापळा कार्यवाही करण्यात यावी. त्यावरुन दिनांक 05/03/2024 रोजी तात्पुरत्या स्वरुपात स्वतंत्र वेगवेगळया कागदी पाकीटात व्हाईस रेकॉर्डर व 3,000/- लाच रक्कमेचे पाकीट सिलबद करुन ठेवण्यात आले.

दिनांक 11/03/2024 रोजी माझे आईची प्रकृती अचानक खराब झाल्याने तीस मी दवाखाण्यात घेवुन जाणार असल्याने पोनि वाघमारे साहेब यांना फोनव्दारे विनंती केली की, लोकसेवक मोहन देशमुख यांच्यावर दि. 12/03/2024 रोजी सापळा कार्यवाही आयोजीत करावी.

दिनांक 12/03/2024 रोजी गंगाखेड येथे करण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीत मी विनंती केली की पंच क्रं. 01 फड यांचे ऐवजी पंच क्रं. 02 सय्यद इम्रान सय्यद युनूस यांना माझे सोबत पाठविण्यात यावे कारण दिनांक 05/03/2024 रोजी पडताळणी कार्यवाहीत लोकसेवक देशमुख यांना पंच क्रमांक 01 फड यांचा संशय येत होता. ते माझे सोबत आले तर लोकसेवकास पुन्हा संशय येईल.

त्यानंतर पोनि वाघमारे यांच्या सुचनेनुसार दि. 05/03/2024 रोजी तात्पुरत्या स्वरुपात सिलबंद केलेले व्हाईस रेकॉर्डर व 3,000/- लाच रक्कमेचे पाकीट बाहेर काढण्यात आले. त्यानंतर मी व दोन्ही पंचांनी पाकीट सिलबंद असल्याची खात्री केली. पोशी/कल्याण नागरगोजे यांनी सदर पाकीटाचे सिल काढुन सोनी कंपनीचे डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत पुर्वी प्रमाणे माहिती दिली. त्यानंतर सांगितले की, सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये दिनांक 05/03/2024 रोजी वापरण्यात आलेले मेमरी कार्डमधील फोल्डर मध्ये आज दिनांक 12/03/2024 रोजी एक नवीन फाईल तयार होईल त्या फाईल मध्ये माझे व लोकसेवक मोहन देशमुख यांच्या भेटी दरम्यान होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत होईल. तसेच मी जमा केलेल्या लाच रक्कमेस यापुर्वी अॅन्थ्रासिन पावडर लावलेले आहे. ती रक्कम सापळा कार्यवाहीत लोकसेवक मोहन देशमुख यांना द्यावयाची आहे. असे सांगुन पोह/निलपत्रेवार यांनी ती लाच रक्कम माझे शर्टच्या डावे खिश्यात ठेवुन दिली. त्यानंतर माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून देण्यात आले.

त्यानंतर मी पंच क्रमांक 02 सयद इम्रान सयद युनुस यांचेसह माझे जवळील मोटारसायकलने सोपान काकाच्या मंदिराजवळील लोकसेवक देशमुख यांच्या रूमवर गेलो असता ते रूमवर मिळुन न आल्याने मी पंचासह तालुका कृषि

कार्यालय, गंगाखेड येथे गेलो. तेथे कार्यालय बंद असल्याने मी परत सोपान काकाच्या मंदिरावजळील लोकसेवक देशमुख यांचे रूमजवळ येवुन थांबलो. त्यानंतर काही वेळाने लोकसेवक देशमुख हे रूमवर आले त्यानंतर मी पंच क्रमांक 02 यांना रूमच्या बाहेर थांबवुन रूममध्ये गेलो. त्यावेळी लोकरोवक देशमुख यांचे सोबत माझे पुतण्याच्या कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी त्यांनी मला हाताच्या इषा-याने लाच रक्कम मागीतली त्यावेळी मी त्यांना माझे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यातुन 3,000/- लाचेची रक्कम काढुन लोकसेवक मोहन देशमुख यांना दिली. त्यावेळी ती त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या अंगावरील शर्टच्या डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवली. त्यानंतर मी रूमच्या बाहेर येवुन सापळा पथकास दिरोल अश्या पध्दतीने डाव्या हाताने उजव्या हाताची शर्टची भाही वर करून लोकसेवक यांनी लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजित इशारा करताच सापळा पथकाने लोकसेवक मोहन देशमुख यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले. त्यानंतर लोकसेवक मोहन देशमुख यांना पोनि श्री वाघमारे यांनी सापळा पथकाची ओळख करुन देवुन दोन्ही पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव मोहन सुरेशराव देशमुख, वय 48 वर्षे, पद कृषी पर्यवेक्षक, तालुका कृषी कार्यालय, गंगाखेड, जि. परभणी राहणार ह.मु. गणेश नगर, अहमदपुर मुळ गाव मु. पो. वळसंगी, ता. अहमदपुर जि. लातुर असे सांगितले. त्यानंतर पोनि वाघमारे साहेब यांनी लोकसेवकाच्या रूमची पाहणी केली. त्यानंतर सापळा पथकाने लोकसेवक मोहन देशमुख यांना पुढील कार्यवाहीसाठी पोलीस ठाणे गंगाखेड येथे घेवुन आले आहेत.

दिनांक 05/03/2024 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक कृषी पर्यवेक्षक, मोहन देशमुख यांनी मला माझ्या पुतण्या नामे यशोधन यास अनुदानावर मंजुर झालेल्या रोटा व्हेटरच्या कामाचे तसेच माझा भाउ जगमित्र याचे यापुर्वी केलेल्या टॅक्टर मंजुरीच्या कामाचे असे मिळुन 3,000/- रुपये लाचेची मागणी करुन ती दिनांक 12/03/2024 रोजी 09:46 ते 10:32 वाजण्याच्या दरम्यान करण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीत गंगाखेड येथील सोपान काकाच्या मंदिराजवळील लोकसेवक यांच्या रुमवर लोकसेवक मोहन देशमुख यांनी पंच क्र 2 सय्यद इम्रान सय्यद युनूस यांचेसमक्ष 3,000/- रुपये लाचरक्कम स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष                फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DeepakKumar Chudaman Waghmare(I (Inspector)) / POBN72857 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): सदानंद वाघमारे

**Rank** (पद): पो.नि. ACB परभणी. **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): DeepakKumar Chud
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN72857

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, गंगाखेड